FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य / State: महाराष्ट्र, जिल्हा / District: मुंबई, पोलीस ठाणे / Police Station: ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. / FIR No.: २२, वर्ष / Year: २०१८, दिनांक / Date: १८/०६/२०१८

2. (i) अधिनियम Act: प्र.भ्र.अधि. १९८८ (सुधारणा २०१८), कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ........................, कलमे Sections ........................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........................

3. (a) अपराधाची घटना: वार / Occurrence of offence: Day: बुधवार, तारीख पासून / Date from: १५/०६/२०१८, वेळ / Time: १०.०० वा., तारीखे पर्यंत / Date to ................, वेळ / Time ................
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा / Information received at P.S. तारीख / Date: १८/०६/२०१८, वेळ / Time: १४.३० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference: Entry No.: २८/१८, तारीख / Date: १८/०६/२०१८, वेळ / Time: २१.१५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: ........................, लेखी / ~~तोंडी~~ Written / ~~Oral~~

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण / Place of Occurrence:
   (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Direction and distance from P.S.: उत्तरेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. / Chouki/Beat/O.P. Name and No. ................
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर / No. if any, गल्ली / Ward, रस्त्याचे नाव / Name of road: महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय दुसरा मजला
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable Place, गाव / Village, पोस्ट / Post, तालुका / Taluka, जिल्हा / Distt., राज्य / State: सरकारी अभियोक्ता यांचे कार्यालय अंधेरी (पू) मुंबई, महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station ................, तालुका / Taluka ................, जिल्हा / Distt. ................, राज्य / State ................

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.
   (a) नाव Name: श्री. सुजित जाधव
   (b) वडीलाचे / पतीचे नाव / Father's /Husband's Name: श्री. शंकरराव जाधव
   (c) जन्म तारीख व वय / Date of Birth & Age: ४९ वर्षे
   (d) राष्टीयत्व / Nationality ................, फोन नं. / Phone No.: ७३८७४७३३३३
   (e) पारपत्र क्रमांक / Passport No. ................, दिल्याचा दिनांक / Date of Issue ................, दिल्याचे ठिकाण / Place of Issue ................
   (f) व्यवसाय / Occupation: व्यवसाय व नोकरी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: मराठा, जनजात Sub-Caste ................
   (h) पत्ता / Address: गल्ली / सर्वे नं. / Ward, घर / नाव नंबर / House/Name No.: सी.२० आय डी बी आय कॉलनी, आय डी बी आय इस्टेट, फोन / मो. नंबर / Phone/M. No.: ८७८८५३९३८६, पॅन नं. / Pan No. ................, वोटर्स नं. / Card No. ................
   रस्त्याचे नाव / Road ................, जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ................, गाव / Village: वाघोली, पोस्ट / Post: ता हवेली, पो. स्टे. / P. Stn.: जि. पुणे.
   तालुका / Taluka ................, जिल्हा / Distt. ................, राज्य / State ................, सध्याचा पत्ता / Present Address ................

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   १) श्रीमती जगताप (सरकारी अभियोक्ता)

क

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...... नाकाब
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मूल्य ......
Total Value of properties stolen / involved ......

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ......
Unnatural / Accidental Death Case No., if any –

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

बाजूस नमूद तारखेस, ठिकाणी व वेळी फिर्यादी यांचे विरुद्ध दाखल गुन्ह्याचे सुनावणी वेळी मा० न्यायालयात शासनाच्या वतीने म्हणणे सादर करण्याकरीता कॉलम क्र.७ मधील नमूद आरोपी लोकसेविकेने स्वतः-करीता शासकीय परिश्रमिक स्वरूपात रु. ५०,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केली. नमूद लोकसेविके विरुद्ध कलम ७ भ्र.प्र. अधि. १९८८ (सुधारणा-२०१८) अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अविनाश का. जगताप, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P.S ......, District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

19/06

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .. अविनाश का. जगताप
पदनाम Rank .. पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ......

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

યાતીલ ભિઝવીત, શ્રી સુનિલ ઝોકુશાવ નાયીવ, યાંચા લાયુકતનુદ્ર
ક્ષવંગા ભાગાલાવર [illegible] [illegible] ઝાલક લી યાગુનયાચી
પ્રયત્ન રવકર સંબોધવાત યેત આહે.

[illegible signature]
19/08
(ઑનિલમા બો. નાગાનાય)
પોલિસ નિરીક્ષક
લા.પ્ર.વિ. મુંબઈ વિભાગ.

फिर्याद दि. १९/०६/२०१९

श्री. सुजित शंकरराव जाधव, वय ४१ वर्षे, धंदा — शेती व सॉफ्टवेअरचा व्यवयास, रा.ठि. सी—२०, आय्.व्ही.व्हीला आय.व्ही.इस्टेट, वाघोली, पुणे—४१२२०७ साईसंतोष बंगला, मु.पो.त्रिपुटी, ता.कोरेगांव, जि.सातारा, महाराष्ट मो. क्र.७३८७७१३३३३

———

मी वरीलप्रमाणे असून नमुद पत्त्यावर गेल्या तीन वर्षापासून माझे कुंटुंबियांसह रहावयास आहे. माझा सॉफ्टवेअरचा व्यवयास असुन, ऑफिस—आर.एस.इनफोमिडिया एल. जी.२९ सिनर्जी स्पेसेस, इस्ट कोर्ट, विमाननगर पुणे, येथे मागील आठ वर्षापासून व्यवसाय करीत आहे. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत आहे.

अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील गु.र.क्र.५५/२०१२ कोर्ट केस क्रमांक पीडब्ल्यु/५६५/२०१८ या गुन्हयात मी आरोपी असल्याने कोर्ट नं.६६ अंधेरी कोर्ट, तळमजला, अंधेरी येथे माझी दिनांक १५/०६/२०१९ रोजी तारीख होती. त्यादिवशी सदर गुन्हयातील फिर्यादी श्री.अब्दुल सलाम गुलाम मोमीन वय ६३ व श्री.अल्लाउद्दीन शेख वय ६४ याच्यासोबत समजुतीने सदर गुन्हा संपविण्याचा अर्ज माझे वकील श्री.पंढरी पालेकर यांच्या मार्फत मा.६६ वे न्यायालयास सादर केला. मा.न्यायालयाने सदर अर्जावर नमुद गुन्हयातील फिर्यादी यांचे म्हणणे ऐकूण तसेच सर्व साक्षीदार यांचे म्हणणे ऐकूण सदर अर्ज मला मान्य असल्याने मा.न्यायालयाने सरकारी वकील श्रीमती जगताप मॅडम यास त्यांचे म्हणणे मांडण्यास सांगितले असता सरकारी वकिल श्रीमती जगताप मॅडम यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता मा.न्यायालयाकडून वेळ मागून घेतला. व त्यानंतर त्या दुस—या मजल्यावर त्यांच्या कार्यालयात जाण्याकरीता निघुन गेल्या.

मी न्यायालयात बसलेलो असताना सायंकाळी १७.०० वाजण्याच्या दरम्यान माझे वकील श्री.पंढरी पालेकर यांनी मला सरकारी वकील श्रीमती जगताप मॅडम यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे वकील श्री.पालेकर यांच्या समवेत सरकारी वकील श्रीमती जगताप याच्या कार्यालयात गेलो. त्यांच्या कार्यालयात आम्ही दोघे गेल्यानंतर सरकारी वकील श्रीमती जगताप यांनी माझ्याकडे मा.न्यायालयात म्हणणे मांडण्यासाठी रु. ५०,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केली. सदरची मागणी मला मान्य नसल्याचे मी त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी त्यांचे म्हणणे मा.न्यायालयात मांडण्यास नकार दिला व तुम्ही पुढील तारीख घ्या असे मला माझ्या वकीला समक्ष सांगितले. त्यानंतर त्या पुढे म्हणाल्या की,पुढील तारखेस येताना संपुर्ण रक्कम पन्नास हजार घेवून यावे तरच सेटलमेंन्ट होईल असे म्हणाल्या. नमुद सरकारी वकील श्रीमती जगताप यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने व सदर व्यवहाराने मी व्यथीत झालो असल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधण्याचे ठरविले.

समक्ष
(signature) 19/06

( अविनाश जगताप )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature)
19/06/19

सदरबाबत मी दिनांक १९/०६/२०१९ रोजी लाचेसंबंधीत तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष हजर राहिलो. साधारण १४.३० वा. पोलीस निरीक्षक श्री.अविनाश जगताप यांनी मला नमूद कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील गोपनीय कक्षात नेवून माझ्या तक्रारीबाबत चौकशी केली. त्यानंतर पो.नि. जगताप यांनी सदर कार्यालयात हजर असलेले सपोआ क्षिरसागर हे पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर पो.नि. जगताप यांनी माझी, पडताळणी पथकातील अंमलदार व पंच यांची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. जगताप यांनी मला माझी तक्रार मराठीत एका को—या कागदावर लिहून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे सदरची तक्रार मी मराठीत लिहून दिली.

दिनाक १९/०६/२०१९ रोजी, मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे, दोन पंच साक्षीदारांसमक्ष पो.नि. जगताप यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी केली. ज्या लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांचेशी कामाबाबत चर्चा करण्याकरीता गेलो असता त्यांनी कोर्टच्या मागील बाजुच्या व्हरांडयात बोलावून मा.न्यायालयात म्हणणे मांडण्याकरीता रुपये पन्नास हजार इतक्या रक्कमेची मागणी केली. जर पीपीनी ऑब्जेक्शन घेतलं तर तुमचे काम होणार नाही तुमचे जर काम व्हावे असे वाटत असेल तर यू मेक अ पेंमेंट ऑफ फिफ्टी थाऊझन्ड..... यू व्हिल गेट इट डन......व त्यानी दिनांक २२/०६/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता सदर लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले कारण त्याच दिवशी माझ्या केसची तारीख आहे. वर नमुद पडताळणीच्या वेळी माझ्या शर्टाच्या आत बनियानला लावण्यात आलेल्या डीजीटल रेकॉर्डरमध्ये माझे व लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांच्यातील संभाषण रेकॉर्डींग करण्यात आले आहे.

दिनांक १९/०६/२०१९ रोजी माझ्या तक्रारीची पंचासमक्ष झालेल्या पडताळणीमध्ये अधेरी न्यायालयातील कोर्ट .६६ मधील लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांनी माझेकडे रु.५०,०००/— लाचेची मागणी करुन, सदर लाचेची रक्कम दिनांक २२/०६/१९ रोजी स्विकारण्याचे कबुल करून त्यानी मा.न्यायालयात सदर रक्कम घेवून येण्यास सांगितले आहे. त्यामुळे माझी लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांचे विरूध्द वरील प्रमाणे फिर्याद असुन कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझे अंधेरी कोर्ट कोर्ट न.६६ मधील लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप मॅडम यांचेशी माझे पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत.

समक्ष
19/06

( अविनाश जगताप )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

19/06/19

**लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांचे वर्णन —**

वय अंदाजे ३५ वर्षे, उंची ५ फुट २ इंच, रंग सावळा, सडपातळ बांधा, डोक्यावर काळे केस, नेसणीस काळी पॅन्ट व सफेद रंगाचा शर्ट व त्यावर काळा कोट वकीलाचा युनिफॉर्म, मराठी व इंग्रजी भाषा बोलतात.

मी लोकसेवक सरकारी वकील श्रीमती जगताप यांना लाच म्हणून देण्याकरीता रूपये ५०,०००/— माझ्या बचतीतील रक्कमेतून आणले आहेत.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मी वाचून पहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

19/06

( अविनाश जगताप )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

19/06/19